(३) मतिविकार — श्री. कृ. कोल्हटकर

'रंगभूमी' नियतकालिकाचा काळ हा मराठी नाट्यसृष्टीचा सुवर्णकाळ होता. या नियतकालिकाच्या जन्मापूर्वीच किर्लोस्करांच्या नाट्यकर्तृत्त्वाने नवचैतन्य निर्माण केले होते. संगीत नाटकाची मुहूर्तमेढ रोवून विद्ग्ध अभिरुचीला आवाहन केले होते. किर्लोस्करांच्याच परंपरेतील असलेल्या आणि त्यांचे शिष्यत्व पत्करलेल्या गो. ब. देवल यांनी रुपांतरित केलेल्या आणि स्वतंत्र (एक) अशा दोन्ही प्रकारच्या नाटकांनी आपले स्वतंत्र स्थान निर्माण केले होते. त्यानंतर श्री. कृ. कोल्हटकर, कृ. प्र. खाडिलकर, राम गणेश गडकरी, भा. वि. वरेरकर यांचे नाट्यलेखन रंगभूमीच्या काळात झाले. यापैकी प्रत्येक नाटककाराने आपापल्या स्वतंत्र वैशिष्ट्याने नाट्याविश्वावर आपला ठसा उमटविला आहे.

श्रीपाद कृष्ण कोल्हटकर
किर्लोस्कर नाटक मंडळीचे नाटककार

श्री. कृ. कोल्हटकर यांचे पहिले नाटक वीरतनय हे इ. स. १८९४ मध्ये लिहिले गेले आणि इ. स. १८९६ मध्ये ते किर्लोस्कर नाटक मंडळीने रंगभूमीवर आणले. किर्लोस्कर नाटक मंडळीने इ. स. १८९४ मध्ये जाहिरात देऊन, बक्षीस लावून उत्तम नाटक मागविले होते. पण वीरतनय हे नाटक मात्र ती जाहिरात वाचून कंपनीकडे पाठविले नव्हते. एके दिवशी कंपनीच्या बिऱ्हाडी त्या वेळपर्यंत लिहून झालेल्या नाटकाच्या भागाचे वाचन झाले आणि 'त्या८ बैठकीला कोल्हटकरांनी आपले नाटक ऐकवून श्रोते तल्लीन करून सोडले आणि येथूनच ते किर्लोस्कर नाटक मंडळीचे नाटककार झाले. इ. स. १८९६ ते इ. स. १९११ या काळापर्यंत श्री. कृ. कोल्हटकर हे किर्लोस्कर नाटक मंडळीचे एकमेव नाटककार होते. ' पैसा मिळवायला खाडिलकरांची नाटके उपयोगी असली, तरी प्रेस्टिजकरिता कोल्हटकरांचीच नाटके कंपनीला हवीत . असे उद्गार ' मानापमान मध्ये लक्ष्मीधराची भूमिका करणाऱ्या बोडसांसारख्या मार्मिक नटाने काढल्याने नुकतेच प्रसिद्ध झाले आहे. (कोल्हटकर, खाडिलकर व गडकरी - वि. स. खांडेकर ' ाहित्य - नाट्यमहोत्सव अंक, डिसेंबर १९४८, पृष्ठ ४६) श्री. वि. स. खांडेकर यांनी उद्धृत केलेल्या या विधानावरून नाटककार म्हणून त्याकाळी श्री. कृ. कोल्हटकर यांना किती मान होता हे स्पष्ट दिसते.

रंगभूमी नियतकालिकात श्री. कृ. कोल्हटकरांच्या काही नाटकांवर लेखन आलेले आहे. ते सर्वच विस्तृत लेखाच्या स्वरूपात आहे असे नव्हे पण कोल्हटकरांचे नाट्यसृष्टीतील ऐतिहासिक स्थान आणि त्यांचा व किर्लोस्कर मंडळीचा घनिष्ट संबंध लक्षात घेता रंगभूमी नियतकालिकातील कोल्हटकरांच्या नाटकांवरील लेखनाचा विचार आवश्यक ठरतो.

श्री. कृ. कोल्हटकर यांच्या नाटकांवर रंगभूमी नियतकालिकात झालेल्या लेखनाचा तपशील

१. मतिविकार . १, अं. १, ऑगस्ट १९०७ स्फुट विवेचन, संपादक
व. १, अं. २-३, सप्टें-ऑक्टों. १९०७
स्फुट विवेचन - टीकाकारांचा प्रामाणिकपणा - संपादक
व. १, अं. १०, मे १९०८, स्फुट विवेचन टीकाकारांविषयी - संपादक
व. २, अं. २, सप्टें १९०८, परीक्षण लेख,
लेखक - गणेश कृष्ण आगाशे
व. ३, अं.६-७, जाने/फेब्रु. १९१०, ‘नाटकातील नायक व पापभीरुत्व
लेखक - गो. ग. भागवत. या लेखात ‘म तिविकार च्या नायकाचा विचार
व. ४, अं. ४, एप्रिल १९११, ‘चुकांची झोळी - ‘मतिविकार च्या प्रयोगातील दोष
२. वीरतनय . १, अं. ८-९, मार्च/एप्रिल १९०८, प्रयोगातील चुका
३. मूकनायक . ३, अं. ४-५, नोव्हें/डिसें. १९०९, नाट्यविषयक चर्चा
४. प्रेमशोधन . ४, अं. १, जानेवारी १९११, परीक्षणलेख, लेखक - पु. रा. लेले
५. व. ५, अं. ९, १९१३ या अंकात वीरतनय, मूकनायक, गुप्तमंजुष या नाटकांच्या प्रयोगाबाबत काही मजकूर आला आहे.
६. वधूपरीक्षा. ६, अं. ७, डिसेंबर १९१५, आभारपूर्वक पोच

इ . स. १९०७ ते इ. स. १९११ पर्यंत श्री. कृ. कोल्हटकर यांच्या नाटकांवर आणि नाट्यप्रयोगांवर कोणत्या ना कोणत्या स्वरुपाचा मजकूर रंगभूमी नियतकालिकात येत राहिलेला आहे. इ. स. १९१५ मध्ये वधूपरीक्षा या त्यांच्या नाटकाची नुसती आभारपूर्वक पोच संपादकांनी दिलेली आहे. किर्लोस्कर नाटक मंडळीशी इ.स. १९११ नंतर श्री. कृ. कोल्हटकर यांचा संबंध राहिला नाही हे त्याचे कारण असावे.

वीरतनय, मूकनायक, गुप्तमंजुष, मतिविकार, प्रेमशोधन ही नाटके कोल्हटकरांनी किर्लोस्कर नाटक मंडळीकरिता म्हणून लिहिलेली नाटके होती. यापैकी ' मतिविकार वर ग. कृ. आगाशे यांचा, व 'प्रेमशोधन वर पु. रा. लेले यांचा, असे दोनच विस्तृत परीक्षणलेख रंगभूमीत आलेले आहेत. रंगभूमी नियतकालिक सुरु झाले त्यावेळपर्यंत वीरतनय प्रयोगस्थ होऊन अकरा वर्षे झाली होती. त्यामुळे त्या नाटकावर लेख नसावा पण वीरतनयचे प्रयोग चालू होते त्यामुळे त्यातील चुकांचा निर्देश करणारा मजकूर आला आहे. गुप्तमंजुष नाटकावर ठोसर-मराठे यांची नाट्यकलारुक्-कुठार या नावाची संभाषणात्मक विनोदी टीका प्रसिद्ध झाली होती. त्याचा परामर्ष सुदर्शन या टोपणनावाने ' डोंगर पोखरून उंदीर निघाला या शीर्षकाखाली रंगभूमी नियतकालिकात भागश: घेतला गेला आहे. गुप्तमंजुष व मूकनायक वर परीक्षणलेख नाहीत. याखेरीज महाराष्ट्रीय नाटककार या मालेत श्री. मुजुमदार यांनी श्री. कृ. कोल्हटकर यांचे चरित्र लिहिले आहे. (रंगभूमी नवी आवृत्ती मे १९२७, अंक २ व जून १९२७ अंक ३) या चरित्रात श्री. कोल्हटकर यांच्या नाटकांविषयी संपादकांनी लिहिले आहे. या चरित्राची प्रस्तावना रंगभूमी नवी आवृत्ती जुलै १९२७ अंक ४-५ मध्ये आली आहे. त्यातही कोल्हटकर यांच्या नाटकांची चर्चा आहे. श्री. मुजुमदार यांनी लिहिलेले कोल्हटकर यांचे हे छत्तीस पानी चरित्र, त्याच्या प्रस्तावनेसह पुस्तकरुपाने प्रसिद्ध झाले आहे.

'म तिविकार वरील लेखाचा विस्तृत परामर्ष : का

रंगभूमी नियतकालिकात आलेल्या कोल्हटकरांच्या नाटकांवरील दोन परीक्षणलेखांपैकी ' मतिविकार वरील श्री. गणेश कृष्ण आगाशे यांचा लेख अभ्यासासाठी निवडला आहे. याचे कारण श्री. आगाशे यांनी एक नाट्यकृती म्हणून, या परीक्षणलेखात 'म तिविकार चा

स्वतंत्रपणे विचार केला आहे. स्वतंत्र, वाङ्मयीन दृष्टीने केलेली समीक्षा म्हणून या लेखाचा विचार महत्त्वाचा वाटला. ‘म तिविकार चे महत्त्व अनेक दृष्टींनी आहे.

१. मतिविकार हे श्री. कृ. कोल्हटकर यांचे हेतुपूर्वक लिहिलेले पहिले सामाजिक नाटक आहे.
२. श्री. कोल्हटकर यांच्या, या आधीच्या नाटकातील सामाजिक विषय राजे-राण्यांच्या पात्रांच्या माध्यमातून येत होता. या नाटकात सर्वसामान्य पातळीवरील व्यक्तिरेखा आल्या.
३. श्री. कोल्हटकर यांना नाट्यलेखनतंत्राची जाणीव या नाटकापासून होऊ लागली. त्यांचे स्वत:चे हे अत्यंत आवडते नाटक होते.
४. मत्ति नाटकावर जी टीकेची झोड उठली त्यातून तत्कालीन नाट्यदृष्टी दिसते. नाटकांकडून समाजाच्या कोणत्या अपेक्षा होत्या हे कळते.
५. नाटक हा वाङ्मयप्रकार लोकाभिमुख असेल, तरच व्यवहारात यशस्वी ठरतो हे वास्तव या नाटकामुळे नजरेपुढे आले.
६. म तिविकार कडे एक वाङ्मयकृती म्हणून निकोप दृष्टीने पाहाण्याची क्षमता आणि धाडस फार कमी दाखवले गेले. न. चिं. केळकर व आगाशे यांचे लेख याला अपवाद ठरले.
७. दोन विरुद्ध टोकाची मते ज्या नाटकाबद्दल व्यक्त झाली असे हे नाटक आहे.
८. मतिविकार पडणे आणि कीचकवध लोकांकडून उचलले जाणे याला महाराष्ट्रच्या सामाजिक, राजकीय संदर्भात फार अर्थ आहे.
९. त्तत्कालीन प्रेक्षकांच्या अभिरुचीची ताकद व मर्यादा या दोन्ही गोष्टी या नाटकाच्या निमित्ताने स्पष्ट झाल्या.
१०. प्रतिकूल वातावरणात श्री. शंकरराव मुजुमदार यांनी किर्लोस्कर नाटक मंडळीचे मतिविकारचे प्रयोग चालू ठेवले होते ही घटना वैशिष्ट्यपूर्ण आहे.

११. श्री. राम गणेश गडकरी यांना मतिविकार नाटक तोंडपाठ होते. कोल्हटकरांच्या फेल्युअरमधून मी यश मिळवून दाखवेन असे त्यांनी म्हटले व ेमसंन्यास ला यश मिळालेही.
१२. मतिविकार, हे बालगंधर्व, किर्लोस्कर नाटक मंडळीत आल्यावर मंडळीने बसविलेले पहिले
नाटक आहे.

श्री. पु. रा. लेले यांचा प्रेमशोधन वरील लेख हा कोल्हटकरांच्या आक्षेपकांचे खंडन करण्यासाठी आणि कोल्हटकरांचे समर्थन करण्यासाठी लिहिलेला आहे. या लेखात सूक्ष्म विवेचन आणि ‘प्रेमशोधन ची वैशिष्ट्ये आलेली आहेत पण हा लेख एक भूमिका घेऊन लिहिलेला लेख आहे. तो मुक्त रसास्वाद नाही. त्यामुळे तुलनेने मतिविकार वरील लेख अधिक महत्त्वाचा वाटला म्हणून रंगभूमी नियतकालिकात ‘मतिविकार संबंधी आलेल्या एकूण मजकुराचा आढावा घेऊन श्री. आगाशे यांच्या परीक्षण लेखावर विशेष लक्ष केंद्रित केले आहे.

मतिविकार चे कथानक येथे थोडक्यात सांगणे योग्य ठरेल. कारण आज हे नाटक काळाच्या ओघात मागे पडलेल्या नाटकांपैकी आहे. ते पुस्तकरुपाने सहज उपलब्ध नाही. प्रयोगरुपाने डोळ्यापुढे तर मुळीच नाही म्हणून कथानक थोडक्यात देणे योग्य वाटते.

‘मतिविकार चे कथानक

मनोहर, चकोर व तरंगिणी अशी तीन भावंडे असतात. तरंगिणीचा, विहार हा पती आणि आनंदराव सासरा असतो. चंद्रिका ही विहारची विधवा बहीण म्हणजेच तरंगिणीची नणंद असते. सरस्वती ही वृद्ध आनंदरावाची तरुण पत्नी. हरिहरशास्त्री नावाचा एक दुष्ट शास्त्री आणि त्याच्या विषयवासनेचा बळी ठरलेली वेणू नावाची विधवा. अशी नऊ प्रमुख पात्रे या नाटकात आहेत.

चकोर व चंद्रिका यांचे एकमेकांवर प्रेम असते आणि विद्याभ्यासासाठी जपानला गेलेला चकोर परत आल्यावर त्यांचा विवाह होणार असतो. इकडे मधल्या काळात आनंदराव, सरस्वती या तरुण मुलीशी विवाह करतो आणि या विवाहाच्या बदल्यात चंद्रिकेचा एका

वृद्धाशी विवाह लावून देतो. विवाहातच हा म्हातारा मरतो व चंद्रिका विधवा होतो. चकोर जपानहून आल्यावर त्याला ही सर्व हकीगत कळते. सरस्वतीला स्त्रीधर्म शिकविण्यासाठी आनंदराव मनोहर व हरिहरशास्त्री या दोघांची नेमणूक करतो. सरस्वतीचे मनोहरावर प्रेम बसते. ती आपल्याला मिळावी म्हणून हरिहरशास्त्री कट रचतो. त्यासाठी स्वयंपाकीण म्हणून वेणूला आनंदरावाच्या घरी आणून ठेवतो. काही निमित्त घडून सरस्वती चंद्रिकेला टोचून बोलते मग विहार चंद्रिकेला आपल्या घरी नेतो. सरस्वतीचे मनोहराबद्दलचे प्रेम वाढू लागते. चकोराने चंद्रिकेला मागणी घालू नये, त्यांची भेटही होऊ नये म्हणून विहार, चकोराच्या परदेशगमनाबद्दल ग्रामण्य घालण्याचा बेत ठरवितो. या बेतासाठी हरिहरशास्त्री त्याला प्रवृत्त करीत असतो. विहारला पुनर्विवाह मान्य नसतो. पत्नी मृत्यू पावल्यावर पुरुष जर एकनिष्ठेने राहू शकतो तर स्त्रियांना का राहता येऊ नये असे त्याला वाटत असते. हरिहरशास्त्री आपला हेतू सरस्वतीजवळ व्यक्त करतो. त्यामुळे त्याची आनंदरावाच्या घरातून हाकलपट्टी केली जाते. संन्याशाचा वेष घेऊन चकोर चंद्रिकेला भेटायला जातो. पण तिची पुनर्विवाहाला संमती नसते. त्या दोघांचे बोलणे चालू असतानाच हरिहरशास्त्री व विहार तेथे येतात आणि चकोराची फजिती होते. तेवढ्यात मनोहर तेथे येतो. पुनर्विवाहासंबंधी वादविवाद होऊन विहार प्रतिज्ञा करतो की, जर माझ्यावर विधुर होण्याचा प्रसंग आला तर मी उरलेला जन्म संन्यस्तवृत्तीने परोपकारात घालवीन तेवढ्यात तरंगिणी तेथे येते. विहार तिला आपल्या गावी चालती हो म्हणून सांगतो. तीही निघून जाते. सरस्वतीच्या बाबतीत डाव फसल्यामुळे हरिहरशास्त्री चंद्रिकेवर जाळे टाकतो. चकोराच्या एकनिष्ठ प्रेमाबद्दल तिच्या मनात शंका निर्माण करतो आणि केशवपनाची धास्ती घालतो. विहारापासून दूर राहणे तरंगिणीला कष्टाचे वाटते. परंतु चकोर एक युक्ती सुचवतो. तरंगिणीने आपला प्राणत्याग केला असे विहारला पत्र लिहावे व मनोहराने ते त्याला द्यावे. त्यावर विहाराचा विश्वास बसेलच म्हणजे चकोराने विहाराला आपली प्रतिज्ञा पाळण्यास भाग पाडावे त्यामुळे विहाराच्या प्रेमाची एकनिष्ठता पाहावयास मिळेल. मनोहर याला तयार नसतो. पण आपल्याला कोणी काही विचारल्यास आपण सर्व खऱ्या गोष्टी सांगू तोपर्यंत काही सांगणार नाही अशा अटीवर तो तयार होतो. चकोराचे त्याबरोबर खुलाशाचे पत्र असते. मनोहरावर सरस्वतीचे प्रेम असल्यामुळे आपला डाव फसला असा हरिहरशास्त्रीला संशय असल्यामुळे तो मनोहरला मारण्याच्या तयारीत असतो व तो तरंगिणीसह परत येईल या आशेवर रस्त्यात त्याची वाट पाहत बसतो. मनोहर वाटेने जात असतानाच आनंदरावांच्या घराशेजारी तो त्याच्या डोक्यावर मारतो. मनोहरला आनंदरावाच्या घरी नेण्यात येते. पत्र आनंदरावाच्या हाती लागते विहाराला तरंगिणीच्या मृत्यूची बातमी कळते

तो संन्यस्तवृत्तीने राहण्याचा निश्चय करतो. सरस्वती मनोहरची खूप सेवा करते व आपले प्रेम उघड करते. चकोर, विहारला आपल्या आश्रमात विद्यार्थिनींना शिकविण्याचे काम करण्याचे सुचवतो व विहार ते मान्य करतो. तरंगिणी आश्रमात बुरखा घेऊन ‘ कल्याणी या नावाने राहत असते. विहारला कल्याणीशिवाय काही सुचेनासे होते. विहार आश्रमात आल्यावर चंद्रिका घरी एकटीच असते. हरिहरशास्त्री तिचे केशवपन करण्याचा डाव रचतो. हरिहरशास्त्र्याबरोबर एकटे जाण्याची विहार लेखी परवानगी देतो त्याचा हा मूर्खपणा पाहून चकोर त्याच्याकडून दुसरे पत्र घेतो. चंद्रिकेऐवजी स्वत: देवळात जाऊन हरिहरशास्त्र्याला चांगला मार देतो. हरिहरशास्त्री आनंदरावाच्या मनात मनोहर-सरस्वतीच्या संबंधात संशय उत्पन्न करतो. मनोहर चारित्र्यवान पुरुष आहे हे सिद्ध होते. सरस्वतीलाही स्वत:च्या आचरणाबद्दल पश्चात्ताप होतो. इकडे विहार कल्याणीशी विवाहाला तयार होतो. कल्याणी म्हणजेच तरंगिणी या रहस्याचा स्फोट होतो. विहारचा प्रतिज्ञाभंग झाल्याने तो चकोर-चंद्रिकेच्या पुनर्विवाहाला संमती देतो. पुनर्विवाहाच्या बाबतीत ‘ ादाच्या संमती ची चंद्रिकेने घातलेली अट पाळली जाते व चकोर चंद्रिकेचा पुनर्विवाह होतो.

‘मतिविकार वरील लेखनाचा आढावा

रंगभूमी नियतकालिकात मतिविकार संबंधीचा पहिला मजकूर, व. १ ले, अं. १, ऑगस्ट १९०७ मध्ये स्फुट विवेचन या सदरात आला आहे. या सदरातील निनावी लेखन संपादकांचे आहे.

मतिविकार हे नाटक श्री. कृ. कोल्हटकर यांनी १९०६ च्या मे महिन्यात अवघ्या सात दिवसात लिहिले. किर्लोस्कर नाटक मंडळीचा मुक्काम बार्शीला असताना कंपनीच्याच बिऱ्हाडी त्यांनी हे नाटक लिहिले. मतिविकारच्या संविधानकाची जुळणी त्यांच्या डोक्यात तीन-चार वर्षे चालली होती. ते शंकरराव मुजुमदार ह्यांस लिहिलेल्या एका पत्रात (२ डिसेंबर १९०७) म्हणतात : ‘‘ ‘ मतिविकार कागदावर पडण्यापूर्वी माझ्या डोक्यात तीन-चार वर्षे घोळत होते. हे आपणांस माहीत आहेच. मला संविधानकाची जुळणी करायला नेहमी फार यातायात पडते. संविधानक अगदी नवे रचायचे असून कथाभागांची गुंतागुंत करायची असल्यामुळे संविधानक मनासारखे डौलदार होईपर्यंत डोक्यास फार शीण द्यावा लागतो व कित्येक वर्षे घालवावी लागतात. एकदा कथाभाग मनासारखा जुळला म्हणजे गद्यभाग एका आठवड्यात व पद्ये तीन आठवड्यात, ह्याप्रमाणे एक महिन्यात सर्व नाटक

लिहून पूर्ण करता येते. ’ (साहित्यसिंह - श्रीपाद कृष्ण कोल्हटकर - जीवनगाथा - गं. दे. खानोलकर, पृ. १६१) किर्लोस्कर नाटक मंडळीने १९०७ च्या फेब्रुवारी महिन्यात मुंबईला या नाटकाचा पहिला प्रयोग केला. मतिविकारच्या पहिल्या प्रयोगात सरस्वती - बालगंधर्व, विहार-गणपतराव बोडस, आनंदराव-चिंतुबुवा, हरिहरशास्त्री, राजारामबापू पुरोहित यांनी प्रमुख भूमिका केल्या.

ंरगभूमी नियतकालिकात या नाटकासंबंधीचा पहिला मजकूर पहिल्या प्रयोगानंतर सहा महिन्यातच आलेला आहे. या स्फुट विवेचनात, संपादकांनी ‘ वीन नाटके या शीर्षकाखाली इतर नाटकांबरोबर ‘ मतिविकार संबंधी लिहिले आहे. ‘ मतिविकार च्या निमित्ताने त्यांनी श्री. कृ. कोल्हटकर यांच्या लेखनाविषयी मते व्यक्त केली आहेत. त्या काळात ‘म तिविकार च्या बरोबरीने कीचकवध, बायकांचे बंड, दंडधारी ही नाटकेही गाजत होती. त्यांचाही थोडक्यात परामर्ष या स्फुट विवेचनात घेतला आहे. संपादक, श्री. कृ. कोल्हटकर यांच्या नाटकांविषयी म्हणतात — ‘ रा. कोल्हटकरांची नाटके म्हणजे एक प्रकारचे रणवाद्यच आहे. त्यांचे एखादे नाटक पुढे आले की, रणवाद्याचा इषारा झाल्याबरोबर जसे चोहोकडून वीर खडबडून जागे होतात, त्याप्रमाणे टीकाकारांची ‘प रेड सज्ज होऊन राहते. मराठी भाषेत आजपर्यंत लोकांना प्रिय अप्रिय अशी पुष्कळ नाटके झाली आहेत; परंतु त्यांची तात्पुरती स्तुती किंवा निंदा अथवा ‘ ‘ टीका ’ झाली असेल तेवढीच. पुढे ती टीका व टीकाविषयक दोन्ही तादृश विसरून गेली आहेत. कोल्हटकरांच्या नाटकांनी टीकाविषयक एक वाङ्मय बनविले आहे. त्यानी लोकांना आवडतील अशी नाटके लिहिली असती तर त्यांची इतकी संभावना झाली असती की नाही याची शंकाच आहे. टीका करण्याच्या उद्देशाने तरी त्यांची नाटके वाचणारे, पाहणारे व त्यांविषयी लिहिणारे तयार होतात, हा प्रकार प्रस्तुतच्या स्थितीला काही कमी नाही. ’

वरील विवेचनात खालील मुद्दे आले आहेत —

१. कोल्हटकर यांची नाटके वादग्रस्त असतात.
२. या नाटकांनी टीकावाङ्मयाच्या किंवा समीक्षा वाङ्मयाच्या निर्मितीला हातभार लावला आहे.

३. ही नाटके लोकाविरुद्ध मतांवर आधारलेली असतात.
४. ही नाटके जर लोकमतानुरुप असती तर त्यांवर एवढी टीका झाली नसती.
५. लोकविरुद्धतेमुळे ती नाटके लक्षवेधी ठरतात हा प्रकार ्रस्तुतच्या स्थितीला म्हणजे, नाटक या विषयाच्या अभ्यासाकडे लक्ष कमी असण्याच्या काळात महत्त्वाचा आहे.

कोल्हटकरांच्या नाटकांच्या स्वरूपाविषयी, तत्कालीन सर्वसामान्य सामाजिक विचारधारेविषयी व नाट्यविषयक एकूण वातावरणाविषयी याठिकाणी मोजक्या शब्दात, अचूक अभिप्राय व्यक्त केला आहे.

कोल्हटकरांची नाटके टीकाकारांमध्ये वादळ निर्माण करणारी का ठरत असावीत याचे उघड कारण असे दिसते की सामाजिक सुधारणेला अनुकूल असे मतप्रतिपादन, असे चित्रण, हा कोल्हटकरी नाटकांचा एक विशेष होता. तत्कालीन समाजात एक पक्ष समाजसुधारणा विरोधी होता. या पक्षाच्या मतांची पकड लोकमानसावर अधिक घट्ट होती. स्त्रीशिक्षण, विधवाविवाह, बालविवाहाला विरोध इ. गोष्टी तत्कालीन बहुसंख्य लोकांना न मानवणाऱ्या होत्या. सनातनी मतांच्या लोकांना न रुचणाऱ्या गोष्टींचे प्रतिपादन श्री. कोल्हटकरांनी केले. हा काळाच्या चौकटीत न बसणारा प्रकार होता. सनातनी आणि सुधारणावादी दोन्ही पक्षाच्या लोकांनी कोल्हटकरांच्या नाटकांचा विचार त्यातील प्रतिपाद्य विषयाच्या अनुषंगाने प्राधान्याने केला ही गोष्ट त्या काळाच्या संदर्भात लक्षात घेण्याजोगी आहे. त्यावरून तत्कालीन टीकापद्धतीच्या, समीक्षापद्धतीच्या मर्यादाही कळतात. ज्या कोल्हटकरांनी आपल्या समीक्षा लेखनात सतत कलावादी दृष्टिकोन मांडला त्यांच्या साहित्याचे मूल्यमापन मात्र समकालीनांकडून कलाबाह्य निकषांवर केले गेले. ही त्या काळाची मर्यादा मानली पाहिजे. मुंबईला झालेल्या ‘ मतिविकार च्या प्रयोगांवर ‘ इंडियन सोशल रिफॉर्मर व ‘ मराठा या पत्रात अनुकूल टीका आल्या. त्या वाचून श्रीपाद कृष्णांनी गुर्जरांस लिहिले (फेब्रुवारी १९०७) ‘‘या नंतर प्रतिकूल टीका कितीही झाल्या, तरी त्याची किंमत वाटणार नाही. बहुतकरून ‘नटिव्ह ओपिनियन , ‘ विहारी , ‘ भाला वगैरे पत्रातून तशी टीका यायचा संभव आहे. ’ पुण्याला नाटकाचे प्रयोग सुरू झाल्यावर, त्याप्रमाणे ‘ विहारी , ‘मुमुक्षु , ‘ हंदु पंच , ‘ सुधारक ह्या पत्रातून टीकेचा डोंब उसळला. (साहित्य-सिंह श्रीपाद कृष्ण कोल्हटकर - जीवनगाथा - गं. दे. खानोलकर, पहिली आवृत्ती १९७२, पृष्ठ १६८)

न. चिं. केळकर यांनी पुण्याच्या ‘ ज्ञानप्रकाश मध्ये ‘ मतिविकार वर प्रदीर्घ समीक्षणात्मक लेख लिहिला. तो समतोल आणि या नाटकाकडे एक वाङ्मयकृती म्हणून पाहणारा आहे.

ज्या कारणासाठी कोल्हटकरांच्या नाटकांवर मुख्यत: टीका झाली त्याच कारणांच्या संदर्भात कोल्हटकरांचे समकालीन असलेले कृ. प्र. खाडिलकर लोकप्रिय ठरले. तत्कालीन समाजाला, समाजसुधारणांपेक्षा राजकीय जागृती, स्वातंत्र्याची आकांक्षा अधिक जवळची वाटत होती. लो. टिळकांनी पारतंत्र्याविरुद्ध मने पेटविली होती. सावरकर याच काळात स्वतंत्रतादेवतेचे पूजन करीत होते. ‘र णावीण स्वातंत्र्य कोणा मिळाले या भावनेने देशातील तरुण प्रेरित झाले होते. शिवरामपंत परांजपे यांचा ‘ काळ ब्रिटिशांचा ‘ काळ ठरू पहात होता. अशा वातावरणात ‘ मतिविकार आणि ‘ कीचकवध या दोन्ही नाटकांचे प्रयोग एकाचवेळी सुरु होते. भारतीय संस्कृतीतील आदर्शवाद आणि तत्कालीन राजकीय पार्श्वभूमी यामुळे कीचकवध अत्यंत लोकप्रिय ठरले. जुनी मूल्ये, निष्ठा, परंपरा यांचे दर्शन खाडिलकरांनी आपल्या नाटकांमधून घडविले. त्या मूल्यांचा आग्रह धरणाऱ्या आणि नवीन सुधारणांना विरोध असणाऱ्यांना खाडिलकर जवळचे होते. अर्थात् खाडिलकरांच्या नाटकांमधील नाट्यगुण हे त्यांच्या श्रेष्ठत्वाचे महत्त्वाचे गमक आहे. खाडिलकरांच्या गाजलेल्या नाटकातील भारतीय संस्कृतीचे संदर्भ, त्यातील राजकारण दूर केले तरी त्यातील नाट्य, मनोवेधक आहे. पण असे असले तरी नव्या-जुन्यांच्या वादात लोकमत खाडिलकरांच्या बाजूने आणि विरोध कोल्हटकरांना हे चित्र मात्र स्पष्ट दिसते. तत्कालीन समाजाची, नाटक या वाङ्मयप्रकाराकडे पाहाण्याची दृष्टी कशी होती, त्याचा परिणाम नाटकांच्या लोकप्रियतेवर कसा होत होता हे मांडण्यासाठी या दोन समकालीन नाटककारांचा थोडा तुलनात्मक विचार केला.

कोल्हटकरांची नाटके ‘ णवाद्ये ठरली त्याला आणखीही साहित्यबाह्य कारणे होती असे दिसते. कोल्हटकर हे किर्लोस्कर-देवलांनंतरचे महत्त्वाचे नाटककार ठरले ते नाट्यलेखनाची चाकोरी झुगारून देऊन नावीन्यपूर्ण रचना केल्यामुळे. भरताचे नाट्यशास्त्र प्रमाण मानून केली जाणारी नाट्यरचना कोल्हटकरांनी सर्वस्वी स्वीकारली नाही. पण त्यांनी जी नवीनता आणली त्या नावीन्यामुळे आणि व्यावसायिक गरजेतून सतत चवदा-पंधरा वर्षे किर्लोस्कर नाटक मंडळीसारख्या मातब्बर संस्थेने त्यांना आपला नाटककार मानले. या काळात किर्लोस्कर नाटक मंडळी म्हणजे कोल्हटकरांची नाटके करणारी मंडळी म्हणून ओळखली

जाऊ लागली त्यामुळे काही समकालीन नाटककारांच्या मनात कोल्हटकरांबद्दल ईर्षा निर्माण झाली. त्यांच्या नाटकांना यामुळे काहीसे विरोधी वातावरण निर्माण झाले.

कोल्हटकर हे नाटककार होते त्याआधी ते टीकाकार होते. इतरांच्या नाटकांवर समीक्षालेखन करताना त्यांनी काही कठोर प्रहार केलेले होते. पाटणकरांच्या ' विक्रमशशिकला नाटकावरील, कोल्हटकरांच्या कठोर टीकेतूनच ' वीरतनय जन्माला आले. ते नाटक किर्लोस्कर नाटक मंडळींकडे बक्षीसासाठी पाठविले नसतानाही कंपनीने त्या नाटकाचा स्वीकार केला हा इतिहास सर्वज्ञात आहे. अशा वेगवेगळ्या कारणांमुळे कोल्हटकर हे त्या काळात वाजतेगाजते नाटककार ठरले.

श्री. कोल्हटकर यांच्या नाटकांनी टीकावाङ्मयाच्या निर्मितीला हातभार लावला हा अभिप्राय व्यापक अर्थाने व्यक्त केला असता तर ती विशेष महत्त्वाची गोष्ट ठरली असती. पण येथे समीक्षा या अर्थाने टीका हा शब्द आला नसून ढोबळ अर्थाने आला आहे. कोल्हटकरांच्या नाटकांवरील टीका-वाङ्मय म्हणजे प्रतिकूल अभिप्राय एवढेच संपादकांना म्हणावयाचे आहे. तत्कालीन समीक्षापद्धतीपुढे काही प्रश्न उभे करण्याची ताकद किंवा इतके वेगळेपण कोल्हटकरांच्या नाटकात आढळते का या दिशेने काही विचार संपादकांनी मांडलेले दिसत नाहीत. कलानिर्मितीसारखाच टीकावाङ्मयाचाही कालौघात काही साचा बनून जात असतो. नवे सामर्थ्य प्रकट करणारे, जोमदार अंत:सत्त्व असलेले वाङ्मय, किंवा अशी एखादी कलाकृती जर समोर आली तर समीक्षकांना ते एक आव्हान ठरते. या कलाकृतीने वाङ्मयव्यवहाराच्या कोणत्या ना कोणत्या संदर्भात काही नवे प्रश्न निर्माण केलेले असतात. विशिष्ट वाङ्मयप्रकाराचे नवे रूप प्रगट केलेले असते. म्हणून, समीक्षेला अशा कलाकृतीला सामोरे जाताना वेगळी वाट शोधावी लागते अन्यथा अशा कलाकृतींवरील समीक्षा दिशाहीन होण्याचा धोका असतो. समीक्षेला नवे उत्थान देणाऱ्या कलाकृती या त्या त्या काळातील महत्त्वपूर्ण कलाकृती असतात. कोल्हटकरांचे नाट्यलेखन किंवा त्यांचा प्रकृतिधर्म अशा वेगळ्या वर्गवारीत मोडण्याजोगा होता का अशा काही खुणा जाणवत होत्या का याबद्दलचा विचार या स्फुट विवेचनात नाही. संस्कृत नाट्यशास्त्रातील नाट्यलेखनाचे संकेत काही प्रमाणात दूर सारून, नाट्यसंगीतात बदल करून नावीन्यपूर्ण रचना केल्यामुळे किर्लोस्कर नाटक मंडळींसारख्या मातब्बर नाटक कंपनीने कोल्हटकरांची नाटके स्वीकारली होती. स्वत: संपादक या घडामोडींचे जाणते साक्षीदार होते म्हणून कोल्हटकरांची नाटके आणि त्या नाटकांवरील टीका याबाबत अधिक खोलवर विचार

मांडावयास हवा होता असे वाटते. लोकविरुद्धतेमुळे का होईना, पण कोल्हटकरांची नाटके लक्ष्यवेधी ठरतात हे ‘प्रस्तुतच्या स्थितीला खूप आहे हा सूर तत्कालीन नाट्यविषयक वातावरणाच्या दृष्टीने आशादायक असेल पण कोल्हटकरांच्या प्रतिभेला न्याय देणारा आहे असे म्हणता येत नाही. कारण लोकविरुद्ध मतांचे प्रतिपादन हे कोल्हटकरांच्या नाटकाचे एक अंग-आशयात्मक अंग होते. नाटकातील इतर पैलूंचाही विचार व्हायला हवा असे मत जर संपादकांनी मांडले असते तर टीकाकारांना त्यांनी योग्य दिशादिग्दर्शन केले असे म्हणता आले असते. असा विधायक दृष्टिकोन नाटककार व टीकाकार दोघांनाही हितकारक ठरला असता पण टीकाकारांकडे दुर्लक्षच करावे अशी संपादकांची दृष्टी होती असे‘ टीकाकारांविषयी या पुढील एका, त्यांच्या स्फुट विवेचनावरून दिसते. (व. १, अं. १०, मे १९०८)

या स्फुट विवेचनात संपादकांनी माहिती दिली आहे की अमेरिकन नाटक मंडळ्या टीकाकारांच्या टीकेला मुळीच किंमत देत नाहीत. एकाच नाटकावर अनुकूल आणि प्रतिकूल असे परस्परविरोधी अभिप्राय टीकाकारांकडून दिले जातात त्यामुळे प्रेक्षकांना संदेह उत्पन्न होतो. नाटककार व नाटकमंडळीलासुद्धा कोणत्या टीकेला किंमत द्यावी हे ठरविणे अशक्य होते. अमेरिकेतील नाटक मंडळ्यांचा हा अनुभव सोदाहरण सांगून आपल्याकडे असाच प्रकार ‘ मतिविकार बाबत घडला आहे. त्या संदर्भात काही विचार व्यक्त केले आहेत. ‘ मतिविकार वर एक निनावी टीका झाली. ती संपूर्णपणे विरोधी होती तर दुसरी श्री. न. चिं. केळकर यांची अनुकूल होती. टीकाकारांनी निषेध केलेली नाटके रंगभूमीवर लोकप्रिय झाली आहेत असा अमेरिकन नाटक मंडळ्यांचा अनुभव सांगून संपादक म्हणतात की कोल्हटकरांच्याही सर्व नाटकांचा तोच अनुभव आहे.

या स्फुट विवेचनापूर्वी व. १, अं.२-३, सप्टें-ऑक्टों. १९०७ यामध्ये ‘ टीकाकाराचा प्रामाणिकपणा या शीर्षकाखाली काही मजकूर आला आहे त्यात ‘ मतिविकार चा संदर्भ आला आहे परंतु विशेष महत्त्वाचे असे त्यात काही नाही.

मतिविकार - श्री. गणेश कृष्ण आगाशे, (परीक्षण लेख) रंगभूमी वर्ष २, अंक २, सप्टेंबर १९०८ पृष्ठ १ ते २०)

श्री. आगाशे यांचा हा लेख म्हणजे प्रयोगसमीक्षा नसून संहितासमीक्षा आहे. महाराष्टकवी इतक्याच दृष्टीने कोल्हटकर यांच्या कृतीचा विचार करावा इतकाच हा लेख लिहिण्याचा उद्देश आहे असे लेखातच लेखकाने सांगितले आहे. कोल्हटकर व देवल यांची तुलनाही आगाशे यांनी केली आहे.

श्री. आगाशे यांच्या लेखातील महत्त्वाचे मुद्दे

(१) मतिविकार नाटकाचा मुख्य विषय विधवाविवाह हा असून वृद्धतरुणी विवाहापासून होणारे तोटे दाखविणे हाही एक ग्रंथकाराच्या मनातील दुय्यम हेतू आहे.

(२) या नाटकात उद्दिष्ट हेतूस प्राधान्य मिळालेले दिसते.

(३) मूकनायक नाटकात रसामधील पोष्यपोषक भावांचा विपर्यास झालेला दिसतो तसा प्रकार मतिविकारमध्ये फारसा होत नाही.

(४) देवलांची कवित्त्वशक्ती व कोल्हटकरांची कवित्त्वशक्ती यांची तुलना

(५) कोल्हटकरांच्या नाटकातील एखादा प्रवेश तेवढ्यापुरता जरी सरस वाटला तरी एकंदर नाटकाचा तो एक अवयव यादृष्टीने त्याची सरसता कमी भासू लागते.

(६) एवढा दोष वजा केला तर कोल्हटकरांइतकी उज्ज्वल कवित्त्वशक्ती दुसऱ्या कवीत क्वचितच दृष्टीस पडेल

(७) कोल्हटकरांच्या पद्यात उपमा, श्लेष यांच्या मालिका असतात. त्या चमत्कृतिजनक असल्या तरी अप्रासंगिक असतात.

(८) कोल्हटकर हे आपला वाचक अगर प्रेक्षकवर्ग उत्तम सुशिक्षित आहे असे समजतात. कोल्हटकरांचा वाचक अगर प्रेक्षक नुसता सुशिक्षित असून भागणार नाही तो निरनिराळ्या शास्त्रांशी परिचित असला पाहिजे.

(९) नाटकांपासून करमणूक करून देऊन त्यातले त्यात एखाद्या विषयावर प्रेक्षकांचा अभिप्रायही आपणास पाहिजे तसा इष्ट व्हावा हा हेतू मनात धरून कोल्हटकर नाटके लिहिण्यास प्रवृत्त झालेले आहेत पण प्रश्न इतकाच की ज्यांच्या मनाचा कल बदलावा असा कोल्हटकरांचा हेतू आहे अशा लोकात शास्त्रे अवगत असलेले लोक किती सापडतील म्हणून अशा गोष्टी नाटकात

न आलेल्या बऱ्या

(१०) इंग्रजी भाषेची व इंग्रजी कल्पनांची छाया कोल्हटकरांच्या लेखनात दिसते. इंग्रजी कल्पनांस मराठी पेहराव देणे योग्य वाटत नाही.

(११) कोल्हटकरांच्या नाटकात कोट्या फार असतात. कधी कधी त्या अप्रासंगिकही असतात आणि एखाद्या ठिकाणी अत्यंत अश्लीलही असतात.

(१२) कोल्हटकर कित्येक पात्रांच्या तोंडी जी भाषा व विचार घालतात ते त्या पात्राच्या वयास व

योग्यतेस शोभण्यासारखे नसतात. पात्राच्या भाषणातील कोटीस भुलून जाऊन त्या पात्राची

परिस्थिती ते वारंवार विसरतात हा एक त्यांच्या नाटकात दोष आहे.

(१३) म तिविकार मधील सरस्वतीचे पात्र योग्य तऱ्हेने रेखाटलेले नाही. – संविधानकातला हा एक दोष आहे. विहार या पात्राचा आश्रमातील गोंधळ हाही संविधानकातला आणखी एक दोष आहे. मनोहर या उदात्त विचाराच्या पात्राला लेखकाने अगदी खालच्या पायरीवर आणले आहे. नाटकातील मुख्य पात्रे सरस्वती व मनोहर यांच्या संबंधाने पूर्वापार अनुसंधान राखलेले नाही.

(१४) कोल्हटकरांची कवित्त्वशक्ती जबर पण तिला इतर गुणांची जोड न मिळाल्यामुळे तिचा परिणाम प्रेक्षकांच्या मनावर जितका अनुकूल व्हावयास पाहिजे तितका होत नाही.

श्री. आगाशे यांनी मतिविकार नाटकाचा मूळ उद्देश, संविधानक, व्यक्तिरेखाटन, कोल्हटकरांची भाषाशैली, कवित्त्वशक्ती, देवल-कोल्हटकर यांची तुलना एवढ्या बाबींचा सविस्तर विचार केला आहे. कोल्हटकरी नाटकातील गुणदोष त्यांनी दाखविले आहेत त्याचप्रमाणे तुलनात्मक विवेचन करून कोल्हटकरांच्या प्रतिभेची जात नेमकी कोणती होती हेही अलंकारिक भाषेत सांगितले आहे, श्री. आगाशे म्हणतात —

'देवलांच्या कवित्त्वशक्तीचे उड्डाण पारावतीच्या उड्डाणाप्रमाणे असते. आपले घर नेहमी तिच्या डोळ्यापुढे असते... पण कोल्हटकरांची प्रतिभा निराळ्या प्रतीची आहे. एखाद्या गरुडपक्षाप्रमाणे तिने एकदा का घरटे सोडले की तिला मागचे भान रहातच नाही. तिची भरारी जिकडे जाईल तिकडे जाईल... आपण घरट्यातून बाहेर का पडलो ही कल्पना काही कालपर्यंत तिच्या डोक्यातच येत नाही. स्वारी केव्हा घराकडे वळेल तेव्हा वळेल.' (पृ. ३)

कोल्हटकरांच्या प्रतिभाशक्तीमधील, संयम आणि विवेचकता यांचा अभाव आणि त्यामुळे निर्माण झालेले नाट्यदोष लेखकाने अचूक दाखवून दिले आहेत. लेखाच्या शेवटी कोल्हटकरांना एक सूचना केली आहेआणि त्यांच्या स्वभावानुसार ते तिकडे डोळेझांकच करतील अशी अटकळही बांधली आहे. कोल्हटकर आपली नाटके स्टेजवर येण्यापूर्वी आपल्या मार्मिक मित्रांकडून वाचवून घेतात की नाही माहीत नाही असे म्हणून श्री. आगाशे यांनी, कोल्हटकर मित्रांची मते घेत नसतील तर ती घ्यावीत आणि त्यांच्या सूचना मानाव्यात असे सूचित करतात. गुप्तमंजुष नाटकावर आश्विनीकुमारांनी दिलेली झणझणीत मात्राही कोल्हटकरांच्या बहुधा पचनी पडेल अशी भीती आगाशे यांनी व्यक्त केली आहे.

श्री. आगाशे यांना, कोल्हटकर, आपल्या नाटकांविषयी मित्रांची मते घेत नसावेत असे वाटत असल्याचे दिसते परंतु वस्तुस्थिती तशी नव्हती. 'मतिविकार च्या पहिल्या प्रयोगापूर्वी म्हणजे २९ जाने. १९०७ मध्ये कोल्हटकरांनी गुर्जरांना एक पत्र लिहिले होते. त्यावेळी मतिविकाराची पदे तयार होऊन पुन: तालमी सुरु झाल्या होत्या त्या कोल्हटकरांनी स्वत: येऊन पाहिलेल्या बऱ्या असे गुर्जरांना वाटू लागले. नाटकाच्या गद्य भागात काही फेरफार करण्यासंबंधीच्या सूचनाही जोगळेकर व मुजुमदार यांनी केल्या होत्या त्यासंबंधीही कोल्हटकरांशी चर्चा व्हावी असे गुर्जरांना वाटत होते म्हणून त्यांनी कोल्हटकरांनी मुंबईला यावेच असा आग्रह धरला होता. ह्यासंबंधी गुर्जरांनी कोल्हटकरांना लिहिलेल्या पत्राच्या संदर्भात कोल्हटकर त्यांना लिहितात — ''.. मला येत्या शनिवारी मुंबईस येता येणार

नाही, अशी भीती वाटते. शिवाय माझ्या येण्याची काही आवश्यकताही दिसत नाही. मात्र आपण हरिहरशास्त्र्यांची अश्लीलभाषणे व प्रवेश गाळण्यात रा. रा. जोगळेकर व रा. रा. मुजुमदार ह्यांस मदत करावी, माझ्या मते खालील प्रवेश काढायला हरकत नसावी.